**आकाशवाणी पुणे**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक – 16/06/2024** **वार – रविवार**

---

पाऊस

पुण्यासह राज्याच्या विविध भागातून सध्या नाहीसा झालेला मोसमी पाऊस येत्या तीन ते चार दिवसांत पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता असून प्रामुख्यानं घाटमाथा आणि धरणांच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस होण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. जून महिना निम्मा संपला तरी मोसमी पावसाच्या सरी अजून बरसण्याची शक्यता दिसत नसल्यानं शेतकऱ्यांबरोबरच सर्वसामान्य लोक देखील हवालदिल झाले आहेत. अनेक मोठ्या धरणांनी तळ गाठला आहे.

नद्या

नदी प्रवाही राहणं तसंच नदीकडं जिवंत परिसंस्था आणि स्रोत म्हणून पाहणं अत्यंत आवश्यक आहे. आपल्या घरातून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्यामुळं नदीचा 60 टक्के भाग प्रदूषित होत आहे, तो टाळण्यासाठी नदीचा नैसर्गिक घाट जपणं, नदीची वहन क्षमता वाढविणं गरजेचं आहे, असं प्रतिपादन जीवित नदीच्या संस्थापक शैलजा देशपांडे यांनी केलं. गंगोत्री होम्स आणि भारतीय हरित इमारत परिषदेच्या पुणे शाखेद्वारे 'आपली नदी आपली जबाबदारी' या विषयावर पुण्यात आय़ोजित कार्यक्रमात शैलजा देशपांडे बोलत होत्या.

हवामान

सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालयातील समुदाय औषध विभागानं हवामान बदलाच्या दृष्टिकोनातून सार्वजनिक आरोग्य या विषयावरील आंतर-कमांड परिषदेचं गेले तीन दिवस यशस्वीरित्या आयोजन केलं. या ऐतिहासिक परिषदेत 300 हून अधिक शिक्षक आणि भारतभरातील विविध शाखा आणि संस्थांमधील पदवीधर सहभागी झाले होते.

मुले

लहानपणापासून मुलांवर बुध्दीप्रामाण्यवादाचे संस्कार करण्याची जबाबदारी कुटुंब, शाळा, मित्र, प्रसार माध्यमं यांची असते. मात्र ही जबाबदारी पार पाडली जात नाही अशी खंत ज्येष्ठ विचारवंत डॉक्टर शंकर अभ्यंकर यांनी आज पुण्यात व्यक्त केली. थोर समाज सुधारक गोपाळ गणेश आगरकर यांच्या स्मृती दिनानिमित्त महाराष्ट्र अंधश्रद्धा समिती पुणे शाखेच्या वतीने अभ्यंकर यांना गोपाळ गणेश आगरकर पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. वसंत कदम यांना डॉक्टर भरत दाभोलकर कार्यकर्ता पुरस्कारही यावेळी प्रदान करण्यात आला.

याज्ञवल्क्य

आठ लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलींच्या मोफत शिक्षणाचा शासन आदेश लवकरच जाहीर होईल, असा विश्वास उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज पुण्यात व्यक्त केला. श्री. शुल्क यजु: शाखीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण सभा पुणेच्या वतीनं उभारण्यात येत असलेल्या सांस्कृतिक भवनाचं भूमीपूजन करताना ते बोलत होते. पुणे शहरात अनेक संस्था, संघटना वर्षानुवर्षे समाजसेवेचं काम अतिशय उत्तम पद्धतीने करत आहेत, अशा सर्व संस्थांचा विकास झाला पाहिजे अशी भावना पाटील यांनी व्यक्त केली.

कार

पुण्यातील कल्याणी नगरमधील अपघाताला कारणीभूत ठरलेल्या अल्पवयीन मुलाला जामीन मंजूर करताना बाल हक्क न्याय मंडळानं अनेक चुका केल्या असल्याचा निर्वाळा पाच सदस्यांच्या समितीनं दिला आहे. मंडळाच्या निर्णयाची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या या समीतीनं तयार केलेल्या १०० पानी अहवालात मंडळाद्वारे चुका झाल्याचं नमूद करण्यात आलं आहे.

रस्ता

पुणे प्रादेशिक परिवहन विभाग आणि 'कृझींग सेफ' या संस्थेनं वाढते रस्ते अपघात रोखण्यासाठी 'प्रायोगिक स्तरावर 'रस्ता सुरक्षा आणि अनुभव प्रयोगशाळा' सुरू केली आहे. यात वाहन परवान्यासाठी 'आरटीओ'ची चाचणी देण्याआधी उमेदवारांना तीन स्तरांवर चाचणी द्यावी लागते असं कृझींग सेफचे केंद्र व्यवस्थापक गणेश ओकरे यांनी सांगितलं. पुणे आरटीओ कार्यालयात सुरू करण्यात आलेल्या या लॅबद्वारे घेण्यात येणाऱ्या चाचणीला उमेदवारांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचं ते म्हणाले.

भाज्या

कडक उन्हाळा आणि मान्सून पूर्व पावसाचा फटका फळभाज्यांना बसला असून आज गुलटेकडी इथल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आलेल्या जवळपास सर्वच फळभाज्या महागल्या आहेत. सलग तिसऱ्या आठवड्यात पालेभाज्यांमधील तेजी कायम आहे.

समन्वय

पुणे महापालिकेच्या हद्दीत पावसाळादरम्यानच्या कामात तांत्रिक संवर्गातील सेवक आणि उप अभियंता आणि संबधित महापालिका सहाय्यक आयुक्त यांच्यात समन्वय महत्वाचा आहे असं महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी सांगितलं आहे. कामकाजाबाबत त्यांनी नियमावली ठरवून दिली आहे आणि आदेशही दिले आहेत.

बकरी

पुण्यात आलेल्या विविध महाविद्यालयातील परदेशी विद्यार्थ्यांनी आज सकाळी एकत्रितपणे बकरी ईद साजरी केली. डॉ पी ए इनामदार यांच्या अध्यक्षतेखाली आझम कॅम्पस परिवाराने यासाठी पुढाकार घेतला होता. पुण्याची सर्वसमावेशक आणि प्रेमळ संस्कृती दूरदेशापर्यंत जाऊन पोहोचावी, हाच या उपक्रमामागचा उद्देश आहे असं डॉक्टर इनामदार यांनी यावेळी सांगितलं.

बाजार

बकरी ईद निमित्त जुन्नर तालुक्यातील बेल्हे या ठिकाणी भरत असलेला जनावरांचा बाजार उद्या बंद राहणार असल्याचं पोलिस निरीक्षक सतीश होडगर यांनी सांगितलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**